जाहिरात

शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५

- शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका संचलित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी सन २०२३-२४ करिता तात्पुरत्या स्वरुपात केवळ सहा महिनेपेक्षा कमी कालावधीकरिता दरमहा एकवट मानधनरक्कम रुपये २०,०००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वर करार पद्धतीवरील इंग्रजी माध्यम प्राथमिक शिक्षक या पदाकरिता निवड, प्रतीक्षा यादी, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे नेमणूक करण्यात येणार आहे.
- विहित करण्यात आलेल्या शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचे विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीचे अर्ज, गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या प्रमाणित स्वयंसाक्षांकित, छायांकित प्रतीसह शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका कार्यालय कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ०५ येथे जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ५ दिवसापर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेपर्यंत हस्त पोहोच स्वीकारण्यात येतील. पोस्टाने / टपालाने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करतेवेळी उमेदवारांनी त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत घेवून यावीत.

शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व प्राधान्यक्रमाने खालीलप्रमाणे निश्चित केली जाईल.

१) इयत्ता १ली ते १२ वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. / बी.एड.इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

२) इयत्ता १ली ते १० वी पर्यंत इंग्रजी, १२वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड.इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

३) इयत्ता १ली ते १०वी मराठी अथवा इतर माध्यमातून व १२वी इंग्रजी माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड.इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण

४) इयत्ता १ली ते १२ वी मराठी अथवा इतर माध्यमातून शिक्षण व डी.एड. /बी.एड.इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण.

५) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/सीटीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

एकूण पदे- २६०

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्लूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | १८ | ८ | ७ | ९ | ५ | ५ | ४९ | २६ | ९९ | २६० |

गुणदान तक्ता -

| तपशील | १०वी (गुण) | १२वी (गुण) | डी.एड. /बी.एड.(गुण) | टीईटी (गुण) | अभियोग्यता चाचणी (गुण) | एकूण (गुण) |
|---|---|---|---|---|---|---|
| भारांश | १० | १० | १० | १० | १० | ५० |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारानुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

- सर्वसाधारण अटी व शर्ती-

वयोमर्यादा- (अ) वयोमर्यादा ही जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांका रोजी गणली जाईल

(ब) सर्वसाधारण खुल्या गटासाठी शासकीय नियमानुसार कमाल वयोमर्यादा३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील, अपंगांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. शैक्षणिक पात्रता उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असणे आवश्यक असून गुणवत्ता धारक अर्जदारांना प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवारांनी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची (इ.१०वीचे प्रमाणपत्र) स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१) मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचा दाखला अथवा जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२) महिला विवाहित असल्यास , विवाह प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित पात्रता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन, दबावतंत्र इ. करताना आढळल्यास उमेदवारी अथवा निवड रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४) उमेदवाराने निवड झाल्यावर १ महिन्याच्या मानधनाइतकी रक्कम रुपये २००००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) सेवा अनामत म्हणून महानगरपालिकेच्या कोषागारात जमा करणे आवश्यक आहे.

५) अर्जदाराने आपले अर्ज जाहिरातीमधील विहित नमुन्यानुसार निश्चित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे आवश्यक आहे. सदर पद हे पूर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाचे करार पद्धतीवर ६ महिनेपेक्षा कमी कालावधीसाठी असल्याने या पदावर उमेदवारास शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.

६) अपूर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७) शासकीय व अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना आहेत व राहतील.

८) विहित मुदतीनंतर व अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

९) अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता,जातीचा दाखला इ.आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. सत्यप्रती जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१०) अर्ज सादर करताना उमेदवार यांनी त्यांचे सर्व मूळ प्रमाणपत्रे पडताळणी करिता उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे.

११) यापूर्वी शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे मनपाच्या शाळेमध्ये करारपद्धतीवर काम केलेल्या शिक्षकांचे काम असमाधानकारक असल्यास अशा उमेदवारांचा अर्ज अपात्र करणेचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

१२) उमेदवारांनी अर्जामध्ये मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी देणे अनिवार्य आहे.

१३) वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकामी मोबाईल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१४) टपालाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५) उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्यास अन्य ठिकाणी कोणतीही सेवा / नोकरी करता येणार नाही.

१६) मे. शासनाचे पवित्र पोर्टल मार्फत इंग्रजी माध्यम कायम शिक्षकांची नियुक्ती मिळाल्यास आदेशाच्या दिनांकापासून एकवट मानधन तत्वावरील तात्पुरत्या सेवकांच्या नेमणुका आपोआप संपुष्टात येतील.

१७) उमेदवारांनी हजर होणेपूर्वी विहीत नमुन्यातील करारनामा करणे आवश्यक राहील.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

शिक्षण विभाग (प्राथमिक), पुणे महानगरपालिका

अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा अलीकडे काढलेला आयकार्ड आकाराचा रंगीत फोटो स्वयंसाक्षांकित |
|---|

मा.प्रशासकीय अधिकारी,
शिक्षण विभाग (प्राथमिक),
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सादर....

विषय :- शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळांमध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता सहा महिनेपेक्षा कमी कालावधीसाठी एकवट मानधन दरमहा र.रु.२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) वर करार पद्धतीने प्राथमिक शिक्षक पदासाठी अर्ज

महोदय,

१) अर्जदाराचे नाव : (मराठी)......................................................................................

इंग्रजी : (कॅपिटल मध्ये)........................................................................................

२) कायम राहण्याचा पत्ता : ........................................................................................

३) सध्याचा पत्ता : .......................................................................................................

४) दूरध्वनी/ मोबाईल नं : ........................................................ (अनिवार्य)

५) ईमेल आयडी : ........................................................ (अनिवार्य)

६) जात : ...................... प्रवर्ग : ..................................

७) जन्मतारीख (   /   /   ) अक्षरी : ..................................................

८) वय (जाहिरातीच्या प्रसिद्ध दिनांक रोजीचे ) वर्ष : ........... महिने .............

| अ. क्र. | शैक्षणिक/ व्यावसायिक पात्रता | माध्यम | आर्ट्स/ कॉमर्स/ सायन्स इ. | बोर्ड/राज्य | उत्तीर्ण दिनांक | किती पैकी | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | | | | |
| ३ | डी.एड./डी. टी. एड. | | | | | | | |
| ४ | बी.एड. | | | | | | | |
| ५ | टी. ई. टी. | | | | | | | |
| ६ | अभियोग्यता | | | | | | | |
| ७ | एम.एस.सी.आय.टी | | | | | | | |
| ८ | पदवी | | | | | | | |
| ९ | इतर | | | | | | | |

अर्जासोबत माझ्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, गुणपत्रके व इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती ही सत्य व अचूक आहे. नियुक्तीसाठी जाहिरातीमधील विहित अटी व शर्ती मला मान्य आहेत. तरी माझी एकवट मानधनावर करार पद्धतीने सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी सहा महिनेपेक्षा कमी कालावधीसाठी करार पद्धतीने प्राथमिक शिक्षक या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

आपला / आपली विश्वासू

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे संपूर्ण नाव)

सोबत शैक्षणिक व व्यावसायिक गुणपत्रक व प्रमाणपत्रक व दाखले

## आवश्यक कागदपत्र

1) एस.एस.सी. गुणपत्रक, प्रमाणपत्रक

2) एच.एस.सी. गुणपत्रक, प्रमाणपत्रक

3) डी.एड./डी.टी.एड गुणपत्रक, प्रमाणपत्रक

4) बी.एड. गुणपत्रक, प्रमाणपत्रक

5) टी.ई.टी./सी.टी.ई.टी. गणुपत्रक/प्रमाणपत्रक

6) अभियोग्यता गुणपत्रक/प्रमाणपत्रक

7) पदवी गुणपत्रक, प्रमाणपत्रक

8) शाळा सोडल्याचा दाखला

9) जातीचा दाखला,

9) विवाह नोंदणी दाखला,

10) नावात बदलाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र

11) आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक झेरॉक्स

उमेदवारांनी हजर होणेपूर्वी विहीत नमुन्यातील करारनामा करणे आवश्यक राहील.